

सरिता पदकी

REFBK-0011960
REFBK-0011960

१८८७
म. ग्रं. सं. ठाणें
काव्य
१५६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ३२५९० दि: ...
क्रमांक १४६० नों दि: २३-३-८२



# चैत्रपुष्प

कवयित्री :

सरिता पदकी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32490 वि: काव्य
क्रमांक 9560 नों दि: 13/5/62

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. 99960

REFBK-0011960
REFBK-0011960

ज्ञानराज प्रकाशन

मूल्य दोन रुपये

प्रकाशिका :
सौ. सुधा जोशी
ज्ञानराज प्रकाशन,
४२१, शनिवार पेठ,
पुणें २.

●

मुखपृष्ठ :
श्री. द. ग. गोडसे

●

सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन

●

प्रथमावृत्ति : १९६१

●

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव, पुणें २.

अनुक्रम 32490 वि: ......
क्रमांक 9560 नों: दि: 23/3/6..

# प्रस्तावना

सरिता पदकी म्हणजे पूर्वाश्रमींच्या शांता कुलकर्णी. दहाबारा वर्षांपूर्वी त्या कुमारी-नांवानें त्यांच्या नवथर कविता मासिकांत येऊं लागल्या तेव्हां वाचकांच्या ध्यानांत तें नांव रुजलें. त्या दोनचार वर्षांत अशीं अनेक नांवें रुजत होतीं, मूळ धरत होतीं. मराठी कवितेचेंहि जणूं तेव्हां आश्रमांतर होत होतें. पण नव्या आश्रमाच्या पताका कंठशोष करून मिरविणाऱ्यांपैकीं शांता कुलकर्णी नव्हत्या; सरिता पदकीहि नव्हेत. त्यांची कविता भिडस्त गळ्याची, आणि स्वभावतःच सौम्य भाषेची आहे. डोळ्यावर यावेत असे सोस तिला नाहींत. कोणी म्हणेल, सहज डोळ्यांत भरतील अशीं ठसठशीत लावण्येंहि तिच्यापाशीं नाहीत. नसतील; तिच्या मर्यादशील चालचलणुकीला तीं विशोभित दिसलीं असतीं. असल्या कवितेचा कुळधर्मच निराळा.

या कवितेचें कुळ कोणतें? ऋषीप्रमाणें कवितेचेंहि कुळ पाहूं नये असें खांडेकरांनीं कधीं म्हटल्याचें आठवत नाहीं; नसल्यास म्हणतां येईल. कवीच्या पूर्वजांच्या अस्खलित याद्या म्हणणाऱ्या टीकाकारांची हुशारी ही कांहीशी पंतोजीपणाची आणि कांहीशी पंडेगिरीची असते. हा सगळा गोत्र–विचार फार ताणण्यांत हशील नाहीं. कवितेच्या–आणि एकंदर साहित्याच्याहि–क्षेत्रांत नेहमींच गोलंकार होत आला आहे. संगीतासारखी येथें घराण्याची सोवळी प्रतिष्ठा नाहीं. म्हणून, सरिताबाईंवर एखाद्या विशिष्ट काव्यगुरूचा शिक्का मारूं नये. कवि म्हणून त्यांची घडण होत गेली तेव्हा अनेकांच्या कवितेनें त्या भारून गेल्या असतील. त्यापैकीं कांहींचा कैफ (हा सरिताबाईंच्या आवडत्या शब्दापैकीं एक!) तात्कालिक असणार. पण तो उतरतां उतरतां त्याचा एखादा ओरखडा मागे उरला असेलहि. कांहीं भारणें असें असणार कीं भारून गेल्याची जाणीवहि राहात नसेल. तांबे आणि बोरकर यांच्या कवितेशीं सरिताबाई किती समरस झाल्या होत्या? कदाचित् खुद्द त्यांनाच आज तें नीटसें आठवत नसेल. त्या दोन कवींतील गुरु–शिष्यभाव अगदी ग्रंथमान्य आहे. तांब्यांच्या नाद–स्पर्शानें बोरकर उमलले असतील; पण ते

पुढें फुलून आले ते स्वतःच्या वेगळ्या वैभवानें आणि सुगंधानें. त्या गंधाची आणि तांब्यांच्या गीतकळेची जोड-आठवण सरिताबाईंच्या कविता वाचतांना पदोपदीं सरकून जाते; पण इतकेंच. त्या उभयतांची धाटणी सरिताबाईंनी सहीसही उचलली असें नव्हे. शब्दांच्या नादाबाबत तांब्यांपेक्षां आणि प्रणयाच्या अभिव्यक्तींत बोरकरांपेक्षां त्यांच्यांत अधिक संयम आहे. त्यांची प्रकृति वेगळी आहे; ती इंदिरा संतांना जवळची आहे. पद्मा गोळयांनाहि. ही स्त्रियांची कविता. बोरकरांच्या भाषेचा डौल 'स्त्रीसुलभ' वाटला तरी त्यांच्या प्रेमकवितांतील नजर पुरुषाची आहे! अशी पुरुषांच्या नजरेनें आणि भाषेनें प्रेम रंगविणारी कवयित्री नाहीं असें नाहीं. पण या तिघींची कविता स्त्रियांची आहे—अगदी 'अपौरुषेय'! 'कवयित्री' या लिंगभेददर्शक नांवाला येथें अर्थ आहे!

पण अशी स्त्रियांची कविता खरोखरच निराळ्या बांध्याची असते का, आणि निराळ्या प्रकृतीचीहि? कोठल्याहि साहित्यांत पाहा, कवींच्या मानानें कवयित्री किती थोड्या असतात! स्त्रिया शिक्षणांत मागासल्या होत्या त्या काळींच नव्हे; पुरुष मागासले वाटावे अशा या काळांतहि! बाळपणीं ज्या गीतांवर आपण पोसले जातों म्हणतात तीं अर्थात् 'स्त्रैण'च असतात—आणि जुनीं. पण आपण आतां कवितेंत अन्य गुणांची अपेक्षा करतों. त्या मर्यादित अर्थानें स्त्रैण आणि हळवी कविता लिहिणाऱ्या आणि त्यांना साजून दिसेल अशा थाटानें त्या गाणाऱ्या, स्त्रिया आतांहि आहेतच; पण त्यांचें कौतुक झालें तरी तेंहि मर्यादितच होतें. म्हणजे आपल्या अर्थानें कविता हा पुरुषी वाण आहे का? या जरा अवघड प्रश्नाचें उत्तर 'पुरुषी' शब्दाचा आपण काय अर्थ करतों यावर अवलंबून राहील. आणि काव्याविषयींच्या आपल्या कल्पनांवरहि. आत्मनिष्ठा हें काव्याचें मुख्य लक्षण मानलें तर स्त्रियांना तें वर्ज्य आहे असें कसें म्हणावें? पण काव्यांतील आत्मनिष्ठा ही नेहमींची नसून, तिच्यांत अलिप्तपणाचा, आपल्या भावानुभवाकडे बाहेरून पाहण्याचा, भाग असतो हा विचार मान्य केला तर स्त्रीवृत्तींत त्याचा तेवढा सुकाळ नाहीं असें म्हणावें लागेल. म्हणजे स्त्रिया भावनाविवश असतात या पुराण्या समजाचा हा पुनरुच्चार नव्हे. तसे अविरत गहिंवरानें लिबलिबीत झालेले पुरुष लेखक असतातच! पण त्या लेखण्यांच्या पुरुषीपणाविषयीं शंका

घेतली जातेच !

आत्मनिष्ठा आणि अलिप्तपणा यांची अशी एकत्र गुंफण इंदिरा संतांना जमली; भावनेचा घोळ न घालतां तिचें मर्म धरणारी आणि शब्दांची आरास न मांडता त्या मर्मावर ध्यान खिळविणारी कविता त्यांनीं लिहिली. इंदिराबाईंची नवकवींत गणना होते ती मुख्यतः यासाठींच. प्रतिमा आणि भाषा यांबाबत चमत्कारिक प्रयोग करण्याचा अट्टाहास त्यांनीं केला नाहीं आणि त्यांतून दुर्बोधता पैदा केली नाहीं. नवतेच्या त्या लोकप्रिय उपाधि त्यांनीं टाळल्या. तसें म्हटलें तर एकंदरीनें अलीकडच्या कवयित्री त्या वाटेला गेल्याच नाहींत. त्यांतला बौद्धिक कसरतीचा भाग त्यांना नकोसा वाटला कीं संसारांतल्याप्रमाणें काव्यांतहि नेटका व्यवहार हा स्त्रीला अधिक मानवतो ?

सरिताबाईंचें कवित्व फुललें तें नवकवितेच्या अगदीं पहिल्या मोसमांत. पण तें रुजत होतें तेव्हां त्या मोसमाची चाहूलहि नव्हती; दुसरेंच वारें वाहत होतें. सरिताबाईंच्या समवयस्कांपैकीं कांहींनीं लवकरच जुनी दिशा सोडली आणि ते नव्या वाऱ्याच्या धारेला लागले. सरिताबाईंबाबत असें झालें कीं, नव्यांतील ताज्या हुरुपामुळें त्यांच्या रुचीनें व व्यासंगानें जें संचित जमविलें होतें त्याला टवटवी आली; जुन्यांतील जें कोमेजलेलें आणि विस-विशीत होतें तें झडून गेलें. पण तें संचित मुदलींच झटकून टाकलें नाहीं. त्यांच्या कवितेची वाढ झाली, शब्दकळा अधिक रेखीव होत गेली, विशेष-णांचा मोह ओसरला; पण मूळच्या रूपरंगांत विलक्षण बदल झाला असें नाहीं. तसा कोणताच विलक्षणपणा या कवितेंत नव्हता व नाहीं. एका रसिक सुसंस्कृत शालीन स्त्रीचें हें काव्य–व्यक्तित्व. त्याच्या कुलीन थाटाशीं कसलेंहि भडक वेगळेपण विसंगत दिसेल. या कवितेचा व्याप फार थोडा आहे. संसारांतील प्रीति आणि वात्सल्य यापलिकडचें कक्षेंत ओढण्याचा हव्यास नाहीं. निसर्गसौंदर्य येतें तें प्रीतीच्या प्रतिबिंबभावानें; आणि त्याचाहि पसारा फार आवरलेला आहे. विविधता साधण्याचाहि प्रयत्न नाहीं. तींच झाडें आणि तींच फुलें. पण या प्रीतीच्या छोट्या अंगणांत तीं पुरेशीं आहेत. ऋतूहि तेच–आषाढ आणि श्रावण आणि भाद्रपद–पण त्यानींच हा संसार सदैव न्हालेला आणि डंवरलेला आहे. चैत्र नांवापुरता ! निसर्ग काय किंवा एकंदर कवित्व काय, संसारापासून ‘ दूर दूर ’ जाण्याच्या पळवाटा म्हणून

त्यांचा उपयोग केलेला नाहीं. संसाराच्याच गाथेची ती भाषा आहे.

'सभ्य स्त्री' चांगली नटी होणार नाहीं या बर्नार्ड शॉच्या वचनाच्या चालीवर 'ती चांगली कवयित्री होणार नाहीं' असें कोणी म्हणेलहि : 'सभ्य' शब्द तुम्ही कोणत्या सुरांत म्हणतां यावर तें अवलंबून आहे! आणि कवित्वाचा काय अर्थ घेतां यावरहि. कवित्व म्हणजे निःसंग, कानफाटें स्वैरपण असें मानलें तर कवयित्रींचें एकंदरींत कठिण आहे!

—याचा अर्थ असा नव्हे कीं सरिताबाईंनीं फक्त संसाराची हळवीं–चिंब माजघरांतील गाणीं लिहिलीं. जुन्या स्त्री–गीतांच्या तसल्या नव्या आणि रंगीत आवृत्त्यांचें कांहीं वर्षांपूर्वी पेंव फुटलें होतें. त्यांतील मायेच्या पुरांत मुलेंबाळें, भावंडें, आईबाप, आत्या-मावश्यासुद्धां बुचकळून निघत; पतिदेवांना देखील तसलाच ओलावा मिळत असे बहुधा! प्रेमाचें तें एकच सोज्वळ आणि सरसकट रूप. सरिताबाईंनीं असली भाबडी चंद्रभागा टाळली. प्रेमावर सांवरून आणि सूचकपणें लिहिलें; पण तें प्रेमावरच लिहिलें. तें प्रेम प्रगल्भ आहे; पण त्याचेहि प्रहरभरानें बदलणारे, ऊनसावलीचे खेळ आहेत: कधीं 'संताप्याचा उगाच त्रागा असतो; कधीं उपेक्षेची शंका खुपते; त्या 'खट्याळाच्या खोडीविषयीं' कधीं कुरकुर असते—आणि मग एकाएकीं या सगळयांचा आवेगांत निरास होतो. आणि तें प्रेम खुलेंभोळें नाहीं; थिल्लर नाहीं. त्याच्या चालींत वजन आहे; विचाराचा नेट आणि विनोदाचा तजेला आहे.

पण प्रेमानें 'वेढलेल्या' (सरिताबाईंचा हा आणखी एक आवडता शब्द!) या कवितेला त्यापारचा, म्हणजे येथील अपूर्ण, संसारी प्रेमापारचा एक निश्चळ ध्रुव आहे. निरभ्र क्षणीं तो खुणावतो, त्याची ओढ लागते. तें विशाल आमंत्रण आणि घरकुलाची मिठी या दोहोंच्या ओढाताणींत कवितेला नाट्याचा पीळ चढतो. ही ओढाताण कांहीं नवी नाहीं; ती काव्याइतकीच सनातन आहे. मीराबाईनें त्या ध्रुवाची शोषणारी तहान संसाराच्या बोलभाषेंत सांगितली. या कवितांत मीरा आणि तिचे घुंगुर आणि 'विषाचा प्याला' हीं पुन्हापुन्हा येतात, तीं केवळ एका पुराण्या संकेताचा सोपा उपयोग म्हणून नव्हे. तर त्या तगमगीचें कालनिरपेक्ष प्रतिबिंब म्हणून. तेंच राधा-कृष्ण प्रतीकाचें. त्यांतील 'युगानुयुगिची मनबाधा' पु. शि. रेग्यां-

सारख्या कवीनें किती ताजेपणानें चित्रित केली आहे! सरिताबाईंनींहि ती चिरप्रतिमा अशीच मुक्त-प्रीतीच्या उच्चारासाठीं वापरली आहे. आणि तीहि हलक्या हातानें. ' आकाशाचा मधुर निळा घनश्याम ' त्यांच्या कवितेंत ' वसुधा-राधेशीं ' मीलन व्हावें म्हणून लवतो. या अपरिमित मीलनाची पार्थिव मीलन ही छाया–अस्थिर आणि अंधुक छाया. तशीच दाटलेली यमुना आणि फुटणारा घडा–आणि सगळ्या प्रेमाचें माहेर, गोकुळ. या कवितांचे ते अलंकार नाहींत; किंबहुना केवळ रूपकेंहि नाहींत; इतकें तें सगळें कवितेंत विरून एकजीव झालें आहे.

घरा–अंगणांत घोटाळणारी ही कविता म्हटलें तर तशी निःसंगहि आहे. कारण कधीं ' कळ आनंदाची ' झणझणली कीं ' दिशांचीं कवाडें ' तिला खुलीं होतात. मग ती येथली राहात नाहीं. क्षितिजांच्या हातांत मग ती हरवते. ही जाणीव पुन्हापुन्हा होते आणि पायांत घुंगुर खुळखुळूं लागतात. तो नाद यांतील अनेक कवितांत आहे. त्या नादाची आणि शब्दांची लय कधीं जमते, कधीं जमत नाहीं. कित्येकदा शब्द, मुख्यतः विशेषणें, अतिपरिचयामुळें शिथिलता आणतात. कधीं ओळखीचा पण बाहेरचा सूर चित्तांत व्यत्यय आणतो. पण अभंगांची साधी आणि नेमकी शब्दसरणी पाहिल्यावर विश्वास वाटतो कीं, असला उमाळा झेपण्याइतकी भाषा सरिताबाईंच्या आवाक्यांत आहे. तो उमाळा सच्चा आहे. त्यामागील काव्य-वृत्ति निकोप आहे. आजवरची तिची वाटचाल निरखून तिच्या भविष्यकालीन सामर्थ्याची आणि यशाची हमी देणें मोठेंसें कठिण नाहीं. ती कुंडली या कवितांतच स्वच्छ आहे.

मुंबई {

**—मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष**

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| चैत्रपुष्प | १ | त्या वळणावर | ४६ |
| अन् भरला हा श्रावण | २ | भाद्रपदांतील गोरी दुपार | ४८ |
| मोरपिसारा | ४ | गूढ तुझें संगीत | ४९ |
| हांक तुझी घुमली अन् | ६ | लाजवंती | ५१ |
| वाट पहावी | ८ | तूं वळतां धुंद मुकुंद | ५३ |
| सुरावट | ११ | डहाळी | ५५ |
| नाचण | १२ | ओली न्हाली सांज आली | ५७ |
| सांकडें | १३ | खडा | ५९ |
| ओरखडा | १४ | अंगाई | ६० |
| शब्द भेटला अशब्दा | १६ | साधाया येईना | ६१ |
| अशा श्रान्त सायंकाळीं | १८ | सकाम ही सेवा | ६२ |
| नर्मसखी | २० | श्रावण | ६३ |
| संध्यादीप | २१ | कधींतरी | ६५ |
| तूं तर पैलतिरीं | २३ | ओली झुळूक | ६७ |
| परका | २५ | एकदाच तूं— | ६८ |
| खूण | २७ | तो भरलेला जहरी पेला | ७० |
| वटपत्र शुष्क हें | २८ | फक्त | ७१ |
| संवाद | २९ | श्रावणांतल्या या किरणांपरी | ७२ |
| गळले घुंगुर | ३० | निरोप | ७४ |
| शोध | ३२ | धुतली स्वच्छ हवा | ७५ |
| कधींतरी असें व्हावें | ३३ | तूं नव्हेस माझा कुणी ? | ७६ |
| ऐन श्रावणांत | ३७ | भाद्रपदांतील सकाळ | ७७ |
| काळोख | ३८ | आळवणी | ७९ |
| दाट घनांच्या अंबाड्यावर | ४२ | निःस्तब्ध रात्र ही | ८० |
| तुला पहावेंसें वाटे | ४३ | आषाढाच्या वटपत्रावर | ८२ |
| मेंदी | ४४ | प्राक्तन | ८३ |
| तूं नसतांही | ४५ | | |

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 32490 वि: काव्य
क्रमांक 9460 नों: दि: 26/3/82

## चैत्रपुष्प ।

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ११९६०
मुख्य शाखा (स्थळ प्रत)

निपचित मातीपरी पडावें
अन् सोसावा राग उन्हाचा
पापणी न लववितां पहावा
उगाच त्रागा संताप्याचा

नकळत दबला श्वास सुटावा
–विसरुन व्हावा चैत्रहि शीतल–
झ्याल्या ओठीं हसूं फुटावें
गुल्मोहरचें–निर्भर, अवखळ !

★

## १  अन् भरला हा श्रावण

कधिं हेंही घडायचें
प्राशुनियां हा श्रावण
शोषुनियां वाऱ्यांतुन अमृतकण
माज मला चढायचा
विष प्याल्या मीरेचा !

–आज परी
थिजलेलीं बुबुळें अन्
विझलेली ही काया
अन् ये श्रावण भरून
धुंद श्याम क्षितिजांतुन
आले घन घन जुळून
–यमुनातटिं पुष्ट गोप
झुलति जसे रासांतुन !

–मात्र उभी इकडे
बधिर अंग मन निसंग
ओठ सुके गीत मुकें
भिंगरीच्या गिरकींतुन तुटलेला
गीतांतुन सुटलेला
लय हरवुन बसलेला
त्यक्त मूक घुंगुर मी
...अन् भरला हा श्रावण !

★

## १ मोरपिसारा

वर डंबर मेघांचें
चकचकत्या रेघांचें
अन् अंगांवर फुटलें झुंबर
लवलवत्या भिंगांचें
पालव फुटली पावलांस
कोंवळया गतीची
विमुक्त हसली प्रौढ तनू
भिजणाऱ्या प्राजक्तफुलापरि

—आणिक जेव्हां
न पाहतांही उमगुन आला
त्या तिथल्या
त्या खिडकीमधला
वृष्टिधुंद स्वप्निल दृष्टीचा

हवा हवासा गोड पहारा
थयथयला अवचित पाठीवर
लवथवत्या शंभर डोळ्यांचा
झुलथेंबांचा
मोरपिसारा !

★

## १ हांक तुझी घुमली अन्

मीं म्हटलें होतें कीं
तव एका सादानें
इथले तोडून पाश
धाविन तव रोधानें

स्मृति इथल्या इवलाल्या
माळुनियां कुन्तलांत
घोळ तसा केशरि अन्
नाचवीत पावलांत

मीं म्हटलें होतें कीं
मिटलें माहेर मला
केवळ तव हांकेचा
अन्तराय रे ! उरला

—हांक तुझी घुमली अन्
धस्कन् उरिं गजबजलें
परसांतिल केळीला
विळखा घालुन लपलें !

★

## १ वाट पहावी

वाट पहावी
कातर दुखऱ्या कातरवेळीं
झांपुन येतां हृदयावरतीं गडद सावली
निःश्वासावें – ' येइल येइल कोणी
हें मूढ अकारण सौहृद जाणुनि माझें
भिडवील उरीं अन् गळेल अवजड ओझें '
हरवतां त्या तशा स्वप्नमीलनीं
नकळत नयनें भरुनी यावीं
वाट पहावी !

वाट पहावी
प्रसन्न हंसऱ्या भर मध्यान्हीं
वरि निळा निरामय फुलला हर्ष असीम
अन् जळीं खेळकर चमचमतें रेशीम

तरुंतून स्वरांची झरे मधुर रिमझीम,
त्या तशा नाचऱ्या स्वैर तरल आनंदीं
कुणि यावें यावें,
नयनांत घेउनी विस्मित स्निग्ध निळाई
अन् अधरावरतीं हसरें कूजन कांहीं
मग विरुनी सारें, जाणिव केवळ
निळया लयींत उरावी
वाट पहावी !

वाट पहावी
नभिं डंवरुनि येतां श्यामल घन श्रावणिंचे
कल्लोलुनि उठतां वीणारव अंतरिंचे
तो नाद, वेध तो, सुखद व्यथा ती
असह्य सारें व्हावें

कुणि उन्मद वादळवाऱ्यासम कवळावें
उडवीत भान बेभान प्राण मिसळावे
अन् क्षितिज उजळतां स्मितें तृप्तिचीं
पसरुनि त्यांत जुळावीं
वाट पहावी !

वाट पहावी कधिंही जेव्हां वाटे वाट पहावी
खंत कशाला, गांठ पडावी वा न पडावी
वाट पहावी !

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 32490 वि: काव्य
क्रमांक 9460 नों: दि: 23/3/62

# सुरावट

भरभरणारा अल्लड वारा
भुरेंबावरें वर आभाळ
पागल मोहरले गुल्मोहर
दुरांत भरतो पञ्चम कोकिळ

संथ नदीचें गहिरें पाउल
निश्चल अञ्चल...तन्द्रा निळसर
भुरभुरती पानांच्या जाळ्या
लपछपवित कोरीला नवथर

पितांपितां हें सुख सर्वांगीं
झणझणते कळ आनंदाची
जाणिव बनते तरल सुरावट
खुलीं कवाडें जिला दिशांचीं !

★

## । नाचण

मी तों गृहस्थाची लेक होतें सांभाळून नेक
परी घुंगूर बांधिले मला नादान तूं केलें
धीट घुंगुरांचा ताल पाय झाले चवचाल
मार्गी जाती न सरळ ऐशी पाडिली भुरळ !
जनरीत सोडियेली वहिवाट मोडियेली
नाचें जगा तुडवून तुझे घुंगूर बांधून
परी अवचित असें कां रे उतरतें पिसें ?
विषप्याला येतां पुढें कां रे कोसळे सांकडें ?
–येते हरपली शुद्ध होतें जागी, हतबुद्ध !

★

## सांकडें

थरथरूनही हिर्वळ
बोलघेवड्या पानांची
गेला वारा उडवून
फडफडलें ना उरीं
धीट चुम्बनें थेंबांची
मला नकोशी पाहून
साज रेशीमसरींचा
मन पाहतें मुकाट
—घट्ट ओठ मिटून हें
काय घालून सांकडें

मी कां राहिलें पुतळी ?
गेलें विसरून बोली !
पदराचें कबूतर
गोड वेडेसें काहूर
ओठांबटांत बिंबलीं
जागीं थिजूनच गेलीं !
गेला पुरता विटून
—आला श्रावण दाटून !
चित्त हिंडतें परकें
करूं याला हो बोलकें ?

★

## । ओरखडा

युगायुगांच्या प्रणयक्षणांतुन
लवतो आहे द्रवतो आहे
आकाशाचा मधुर निळा घनशाम,
अन् त्याच्या वक्षावरतीं
रेखित आहे हृद्गत अपुलें
-गंध उसासत—
वसुधा – राधा !

परि अंगावर थिजवुन अंधाराला
नजरेभवतीं आंखुन वर्तुळ चोचींच्या त्रिज्येचें
फुलतो आहे खुलतो आहे
मास्तित अपुल्या
माझ्या मनचा तृप्त कावळा
-आत्मलक्षि अन् आत्मविलक्षण !–

आटोक्यांतिल घरछपरावर आरोहुनियां
टिपतो आहे काकदृष्टिनें
शिळें शीत अन् भिजली भाकर
किति चतुराई !
अन् अन्नब्रह्मीं धुंदावुन त्या
मुक्त खरडतो गान तृप्तिचें
—आकाशाच्या मधुर निळ्या वक्षावर
एक खोल ओरखडा !

★

## । शब्द भेटला अशब्दा

सांजवेळचें विव्हळ
निःश्वासतें नदीजळ
ठाव घेत काळजाचा      गेली पांखराची शीळ

छाया तन्द्रींत सांवळी
भिजे बेभानशी जळीं
कुणी श्यामल गोपिका      श्यामरंगीं हरवली

स्तब्ध क्षितिज आकुल
घेई कुणाची चाहूल
कुणा शुभेच्या पाउलीं      उडे माणकांची धूळ ?

तोंच उठे लखाखून
संध्यातारका प्रसन्न
खिन्न ललाटीं उमटे      दिव्य प्रसादाचें चिन्ह

आणि उदास आनंदें
मन माझें धुंदावतें
एक सायंताऱ्यापरी आठवण जागी होते

एका अशाच पहाटे
सारें पर्याकुल होतें
नव्या प्रकाशाचा होता वेध अवघ्या सृष्टीतें

होतें मधुर वेगळें
तुला मला जाणवलें
परी नव्हतें तयाला स्पष्ट शब्दरूप दिलें

तशा आर्त स्तब्ध काळीं
नेत्रें आपुलीं मिळालीं
शब्द भेटला अशब्दा आणि मौनें झंकारलीं !

★

## । अशा श्रान्त सायंकाळीं

अशा श्रान्त सायंकाळीं
तुझ्या कुशींत शिरावें
जणूं विवश संध्येनें
जलाशयांत विरावें
क्षण प्रेमभेटींत त्या
धुंद मौन गहिरावें
लहरत्या रोमाञ्चांनीं
क्षण भान बहिरावें
हळूंहळूं ओठावर
उमटावे शब्द ज्यांत
अर्ध्याफुलल्या जुईंचा
गन्ध वहावा लाजत
अन्तरंगीं उमटावी
मयसभा बाहेरली

स्तब्ध व्याकुळली राई
सन्ध्यादीपांची नव्हाळी
रंग आकुल मेघांचे
घ्यावे हलकें टिपून
घ्यावें कोवळ्या कोरीला
मऊ शेल्यांत जपून
—तुझ्या कुशींत शिरावें
असे छंद घोळवीत
श्रान्त संध्येच्या अंगणीं
फुलारावा पारिजात !

*

## । नर्मसखी

रात्र थबकली चोरुन
अपुल्या शेजघराच्या खिडकीपाशीं
दाबुन धरला चन्द्रकळेचा
घोळ रेशमी
सतेज मिस्किल डोळे
थोडं हंसले लुकलुक
आणिक हलकें
तिनें फिरविलें माझ्या गालीं
चन्द्रकोरिचें पान केतकी
शहारतां मी
गेली झर्‌कन् पळून मेली
जातांना परि सांडुन गेली
मधुघट तुझिया ओठीं
– माझ्या पागल हृदयीं !

*

## संध्यादीप ।

११९९०

संध्येचा अस्फुट सरता रक्तिमा
झिरपतो आहे
धूसर निस्तब्ध डोंगरामागें,
विरूं लागल्यात जांभळ्या मायेंत
स्वप्नस्थ वस्तूंच्या तरल रेखा,
पसरला आहे अंधुक अद्‌भुत दूर परिसर
– भविष्यासारखा –
खिळवीत अन् भारवीत माझ्या स्तिमित दृष्टीला
उगाच ओतीत उदासीनता – खिन्न बधिरता,
तोंच एकसरीं उठे झळाळून
नगरींतल्या संध्यादीपांची रम्य प्रभावळ,
गंभीर राईशीं खेळत सांगत हिरवें गूज,
आणिक माझेंही
विरत्या रंगांत हरवलेलें

झरत्या अंधारीं बावरलेलें
मनपांखरूं
पंख जुळवून, सुखीं खुशालून
घुसघुसतें त्या प्रकाशकोशांत,
दाटल्या कंठीं उगाच आपुलें
फुलवूं बघतें
मुग्ध कोंवळया – स्वरकलिकांना !

★

# तूं तर पैलतिरीं ।

तूं तर पैलतिरीं
घुमविशि मधु मुरली
अन् मज या इकडे
धुंद खुळी भरली
उगा तुझ्याचकडे
ओढे हृदय खुळें
बघ अपुल्यामधुनी
विकट पूर उसळे
मी तर पुरि डुबली
जरि तुजवरि भुललें
जीवितधन माझें
तव करिं निरवियलें

घे मज ओढुनि वा
खेचुनि बुडव तरी
तूंच थांबवी ही
ओढ उरिंचि जहरी !

★

# परका ।

तो तर परका
तें नयनांतिल आर्जव, मार्दव
कौतुक, लाघव
होतें भासच सारें,
नसत्यावरचे
असत्याचे हे
हट्टी उंच मनोरे,
समजावित लोचट चित्ताला
मी झालें परक्याची
प्रेमांत गुंफल्या सुखमय संसाराची !
– तुज काल पाहिलें परक्या लोकांतून
त्याहुनही परक्या या नयनांनीं
अन् धस्सकन् झाला भास
– छे ! भास कसा मानावा ?–

तव नयनीं दिसला
अगतिक खिन्न दुरावा !
क्षणिं विमूढ नयनांपुढतीं
फडफडला विपरित गाथा
तूं नव्हता परका
नाहिंस परका
उरे शल्य हें आतां !

★

# खूण ।

दुःख मागायची आतां — नाहीं जिद्द उरलेली
आतां भरल्या ताटांत — जीभ आहे रुपलेली
लुब्ध वारांगनेपरी — सुख नाचतें भोंवतीं
खटक्यांचें – लटक्याचे !– — मीठ आहे चवीसाठीं
एकचवी साखरेचा — कांटा चढला मनाला
गुंगीमध्यें गात्र गात्र — हिमरात्रीचा सोहळा !
– पण कधीं शुद्धीसाठीं — कण्हे महिरलें मन
मन्वन्तरांत गुंगीच्या — असा टिकटिके क्षण
तेवढ्याच:क्षणासाठीं — राहूं देत ताटाकाठीं
एक तुझें उष्टें पान
तुझ्या – माझ्या संगतीची — तीच एक आठवण !

★

। वटपत्र शुष्क हें—

ये पसरत धूसर संमोहन संध्येचें
निस्तब्ध गिरि उभे मौनाङ्कित हो राई
तन्द्रींत नभाला स्वप्न पडे चन्द्राचें
वाऱ्याचा उन्मन मधेंच उमटे श्वास
आभास दिव्य हा घेई भारुनि डोळे
–परि जडतां जडतां दृष्टी पडते लटकी –
मन उलटुनि शोधी नातें या दिव्याशीं
येथलेच किंवा जननान्तरिंचे धागे
–पण नसतें नातें जुळतां जुळतचि नाहीं
वटपत्र शुष्क हें सुकेंच वाहत राही !

★

# संवाद ।

तूं असतांना
तुझिया सन्मुख
किति हंसलें मी
साहत सगळें सगळें,
तूं गेल्यावर
तुझिया स्कन्धीं
मान टाकुनी
किति रडलें मी
साहत सगळें... सगळें !

★

## । गळले घुंगूर

गळले घुंगूर झडला उन्माद
पाउलांतली मत्त झपूर्झा आली सांखळून
राजरस्त्यांतल्या सालस गतींत
विषाचा प्याला मीं गाडून टाकिला
आडमनांतल्या कभिन्न तळाशीं
आणि आतां सुखें नांदतें संसारीं !
– परंतु कधींशीं
गगनमंडलीं भासते पियाची विशाल शय्या
किरणपरांनीं नक्षत्रपुष्पांनीं मढवलेली
तीवरी लोभस
पियाची मुखश्री
आणि चित्त होतें विद्ध हिरमुष्टी
रुसतें कुढतें सुखाच्या संगतीं,

अरे, येथले हे तुटावेत पाश
सोनेरी वर्खाचे साखळदंड हे
तुझिया समर्थ हुकुमी हाकेनें
विरावें तुझ्या मी निळ्या आलिंगनीं
एवढेही झालें नाहीं तुझ्यानें
आणि येथली ही शेज सुळींची
अशीच कां रिती अभुक्त रहाणें ?
—एवढंही झालें नाहीं तुझ्यानें
—नाहीं माझ्यानें !

★

## । शोध

खिडकींतुन डोकावुन अपुल्या
चिन्ताकुल आकाश म्हणालें
" सांग असे कां माझा चन्द्रम
तुझ्या मन्दिरीं
नित्यविकासित पुनवेच्या कमलावर
भृंगापरि जडलेला
चुकवुन मज दडलेला ? "
चौकस त्याची नजर
तुझ्यावर पडण्याआधिंच
मुख तुझें झाकिलें
पसरुनि मी कचपाश;
खुळें अजूनहि फिरतें आहे
तुज शोधित आकाश !

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 32490 वि: काव्य
क्रमांक 9460 नोंः दिः 23/3

# कधीतरी असें व्हावें– ।

कधींतरी असें व्हावें–
रात्रीं पहिल्या प्रहरीं
निळयासांवळया तंद्रींत
मग्न असावें आकाश,
पहिल्याच प्रीतीपरी
मुग्ध लाजरा अस्फुट
चंद्रकलेचा प्रकाश,
सारें सुगंधित शांत
तूं–मी असावें संगत
शब्दाविण संभाषत
संगतीचीच नुसत्या
गोड लज्जत चाखत

अवचित तशा काळीं
तुझ्या स्फुरत्या अधरीं
मौनाच्या त्या वेलीचेंच
फूल लाडकें फुलावें
हळूंच तूं कुज्‌बुजावें
" राणी ! या चांदण्यापरी
आहेस तूं भरलेली
माझ्या धुंद अभ्यन्तरीं "

किंवा जावें आषाढांत
पहावया पूर-पाणी
धुंदफुंद प्रवाहाच्या
व्हावें स्तिमित दर्शनीं

आणि लागावी तशीच
उरीं तुझ्याही ओढणी
आवेगांत तूं म्हणावें
" राणी, तुझ्यासाठीं असा
मीही उफाळलों होतों
बांधबंधारे फोडून
तुझ्याकडे आलों होतों
तुला वेढूनव्यापून
धुंदफुंद झालों होतों ! "

किंवा कधीं दुपारचें
फूल तगरीचें फुले
विसावल्या धरणीचे
श्रमसायास निमाले,

तुझ्या सुगंधासारखा
यावा हलका निःश्वास
ज्यांत बहरे तृप्तीचा
अखंडित मधुमास
उमटावेत हळूंच
जरा भारावले शब्द
" राणी ! तुझिया संगतीं
माझ्या तृप्तीचा निवास
शुद्ध निर्मल प्रकाश ! "

असें कधींतरी व्हावें
नित्याचेंच मला वाटे
...असें कांहीं घडे आणि
हुंदक्यांत ऊर फुटे !

★

# ऐन श्रावणांत !

भर श्रावणांत बाई ! उभे पांढरे हे ढग
ऊन पांढऱ्या पायांचें वाढवितें तगमग !
भर श्रावणांत बाई ! उष्ण उसासे धरित्री
आनंदाश्रु ओहळांचे अर्ध्यांतच करपती !

मऊ पिवळा रेशमी साज बाभुळ-फुलांचा
जाई कसा कोळपून माना पडल्या पानांच्या
तृणांकुर कोंवळाले उन्मेषच धरित्रीचे
छाया नाशाची त्यांवर तप्त उन्हांतून नाचे

कोकिळेच्या कंठांतलें गाणें अर्ध्यांतच सुके
पसरलें वर नभ मलूल नि ओकेंओकें
ऐन श्रावणांत बाई ! स्वारी मेघाची कोपली
दानासाठीं उघडिली मूठ अर्ध्यांत झांकली !

☆

## । काळोख

जेव्हां क्षणभर
मैफलींतला कैफ ओसरत होता
पिचतच होतीं चषकावरचीं पाच–माणकें
ठिबकुं लागला होता त्यांतुन
अभाव केवळ !
तेव्हां...काळोख
लटपटणारें बुजरें पाउल
उचलत आला माझ्यापाशीं
कोसळलेल्या बटा सारुनी
अनोळखी डोळयांत खोलवर
ओळख शोधत
वदला आणिक गद्गद होऊन
" राणी !...किती दिसांनीं भेट आपुली
किती युगांनीं !...

भिऊं नको ना,
ये ये जवळीं...मिठींत माझ्या,
हात गुंफुनी...घाल झपूर्झा...वेड लागुनी !
चल ये, दाखव बाळें माझीं
गोजिरवाणी, तारकखाणी !
बघुं दे मज संसार आपुला
अमावसीच्या गहन नभापरि
नक्षत्रीं लवलेला ! "
आणिक वेडा पिसाटापरी
पिंगा घालित फिरूं लागला
भिरभिरूं लागला !...
सांवरीत ती भोंवळ काळी
बजाविलें मीं

" आगन्तुक तूं या संसारीं
पिसाच केवळ !...
कुठलीं बाळें ? कुठले तारक ?
मीं तर केला नवा घरोबा प्रकाशाकडे !
प्रकाश म्हणजे केवळ हंसणें, फेस उधळणें
प्रकाश म्हणजे कैफ कोरडा, धुंद धिटाई !
प्रकाश म्हणजे–तुला न ठावें !
हीं बघ येथे इन्द्रधनुष्यें छान कचकडीं
टिकणाऱ्या अंगाची, टिकणाऱ्या रंगांचीं !
चुकार अश्रूंवर खोवुन हीं
येथे असतें भिरवायाचें
मैफलीत मन जिरवायाचें
अमावसीला हरवायाचें ! "

ऐकुन सारें भ्याला भ्याला
लटपटणारें अधिरें पाउल
टांगुळवाणें
भरभर उचलत निघून गेला
काळोखाचा दुबळा पुतळा
– पहिला प्रियकर माझा !...

★

## । दाट घनांच्या अंबाड्यावर

दाट घनांच्या अंबाड्यावर
माळुन घ्यावे हार सरींचे
शिंपुन घ्यावें अंगांगावर
ओलें अत्तर,
नेसुन यावें वसन लाडकें
तलम श्याम तंद्रीचें,
एकच प्यावा घोट विजेचा,
अवचित यावें तुझ्या मंदिरीं
अन् रुजवावा तव ओठांवर
वर्षेचा उन्मत्त तराणा,
आणि पहावें कुठवर टिकतो
र ! तव आव शहाणा !

★

# तुला पहावेंसें वाटे ।

तुला पहावेंसें वाटें
परी घुंगट सुटेना
वरी पापणी उठेना

झोंबे बोट काजळाचें
मेंदी रंगता रंगेना
साज पुराच होईना !

दारापुढे डोकावतां
दिसे फांकला चव्हाटा
बरा वाटे उंबरठा !

धीर करून निघतां
वाट पळे बारा वाटे
शोध घेत येऊं कोठे ?

★

## । मेंदी

दोन्ही हात गुंतलेले
त्यांत आलास तूं पुढें
– येणाऱ्याला रोखायाला
डोळे करावे केवढे ?

संधि पाहून नाठाळा !
साधायाचें साधलेंस
दोन्ही हातींच्या मेंदीनें
उभें अंग माखलेंस !

★

## तूं नसतांही — ।

हें आकाशाचें दीर्घ निळें चुम्बन
कानाशीं वाऱ्याची नाजुक कुजबुज
ही आठवणींनीं लवलेली वनराई
पायाशीं लाघट रस्त्याची मनधरणी !
—तूं नसतांही हा तूंच भरुन राहशी
अन् बघतां बघतां मीच बने नाहिंशी !

*

। त्या वळणावर –

त्या वळणावर
तलम गुलाबी पुलकीं फुलुनी
उभा थरारत शिरीष हळवा
लख्ख जळीं आभाळ विसांवे
सकाळचा प्राशीत गारवा,
तरणी राई
लेउनि हिरवी गर्भरेशमी
साडी आवडिची
रूप न्यहाळित नितळ दर्पणीं
मुरकत केव्हांची,
रंगत अपुल्या रंगीं
खोवुनि गर्द शेंदरी तुरे
कुठली स्मरुनी रंगपंचमी
गुल्मोहर मोहरे ?

–त्या वळणावर असा खुषीचा
चैत्रोत्सव चालला
घुटमळती तेथेंच मनींच्या
मुग्ध गौळणी खुळ्या !

★

## । भाद्रपदांतील गोरी दुपार

भाद्रपदांतील गोरी दुपार
सांवरीत कोरें हिरवें लुगडें
– जागोजाग चुरगळलेलें !
बसवीत जागीं
बाभूळफुलांच्या कशिद्याची चोळी,
चाळवते आहे
– रतिक्लांतींतून –
झेपावून जातां
मनांत कांहींसें
बेछूट...हिरवें !

★

# गूढ तुझें संगीत ।

हें गूढ तुझें संगीत, प्रिया !
जरि अर्थ न त्याचा मुळिं लागे
तरि क्षणभर रव पडतां कानीं
उरिं असह्य कम्पन हो जागें !

जें हातीं विणिलें स्नेह-जाल
तें रुतु लागे बन्धन बनुनी
मन विटतें सुखमय संसारा
अन् उठतें भरल्या घरांतुनी

त्या उज्ज्वल तुझिया स्वरभुवनीं
मंदाकिनि उसळत अमृतमय
ये क्षाळित उजळित अंतरंग
शांतींत जिवाची लावित लय !

हें गूढ तुझें संगीत, प्रिया !
जरि एकच क्षण पडतें कानीं
मी रमतां त्यांतच भानहीन
शतजन्म निघाले रे उजळुनि ! !

★

# लजवन्ती ।

झिमझिमता धारांचा पडदा
आड तयाच्या
ही लजवन्ती
लाल चुनडी
घुंगट हिरवा
मान जरा लवलेली
पण सावध वेध कुणाचा !
अंगांगावर
रेशिमथरथर
थोडी भ्याली
थोडी उत्सुक
– हा धारांचा पडदा सारुन
काय यायचा
या रमणीचा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११९९०

वर्षाभारित आतुर प्रीतम ?
म्हणुन उभी ही
पेलित थरथर
झेलित शर वृष्टीचे
चौकस जनदृष्टीचे !

★

## तूं वळतां धुंद मुकुन्द-- ।

रे, मी मदमन्थर राधा
तू मोहित श्याम मुकुंद,
बघ, उतट दाटली यमुना
अन् श्रावण लवला धुंद !

केतकी उसासे रानीं
भरि पारिजात मृदुगन्ध
लावण्य जुईचें भिजलें
चेतवितें भलते छंद

झरझरत्या तरल तुषारीं
जाईची विणिली जाळी
लेऊन साज नवलाचा
राधा सजली, धगधगली.

ये झिंगुन लहरी वारा
वेढीत रेशमी शेले
अंगांग लपेटुन निघतां
मी स्वैर अनावर झालें

– अन् विरली यमुना काळी
कांहींच नुरे भंवतालीं
तूं वळतां धुंद मुकुंद
राधाहि नाहिंशी झाली !

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 32490 विः काव्य
क्रमांक 1460 नों दि 9/3/52

## डहाळी ।

जातोस तूं दूर गांवीं
घर होतें सुनें सुनें
माझ्यापरी दीनवाणें

वस्तु वस्तु होते मुकी
अगतिक अन् उदास
तुझा घेऊनिया ध्यास

वाट पहात लोटावा
कसा एक एक दिन
धाक स्वतःला घालून

तूंही निमग्न व्यापांत
धाडितोस चार ओळी
हवा, प्रवास, खुशाली

शब्द एखादा त्यांतच
एखादीच ओळ ओली
अवचित मिठी घाली

— ओस घरामनावर
लवे नाजुक डहाळी
होय पखरण खालीं !

*

# ओली न्हाली सांज आली– ।

ओली न्हाली सांज आली
लवलेल्या आकाशांत
इंद्रनीळ उजळीत

धुंद मीरेच्या मनींचें
रूप सुभग सांवळें
सारीकडे कोंदाटलें

उभें स्तब्ध भोंवताल
श्वास उरीं थबकून
सारे शब्द विसरून

जाई–प्राजक्त अंगणीं
निसासती एकपणीं
झाली गंधाची दाटणी

अशा सांवळ्या निवान्तीं
तूं मी आहोंत जवळीं
जग नाहीं भोंवतालीं

गंध विरावा वाऱ्यांत
तसा शब्द ओठीं बुडे
नशा आषाढाची चढे

बोलापल्याडलें कांहीं
बोभाटलें उरीं आज
सख्या ! सुखीं न्हाली सांज !

★

## खडा ।

कधिं अवचित टिपतो मज
खडा तुझ्या नजरेचा
बोलाचा, चालीचा
अन् फुटतो माथ्यावर
भरला घट मातीचा
झरझरतो थेंबथेंब
भिजतें अंगांग चिंब
लवलेल्या पापणिंतुन
थरथरत्या पुलकांतुन
शब्दांना फुटति कोंभ !
– अन् कळतें तुजला मी
टाळत नच जन-लाजें
शोधी मज गोकुळींच
भय माझें... भय माझें !

*

## । अंगाई

संपवून कामधाम यावें तुझियाजवळ
पापणीशीं झेपलेलें जरा सारावें जावळ
आवराया बाळचाळे कवळावें दोही हातीं
रागारागावत गाल कुस्करावे मुक्या ओठीं
घ्यावें बळेंच कुशींत गात अंगाई लाडकी
काऊचिऊंची धाडावी हट्टी झोपेला पालखी
गन्ध पाकळींत, रात सांजावल्या क्षितिजांत
तशी यावी नीज डोळां रेशमाच्या पावलांत
जड मिटावी पापणी घ्यावें ओढून उबेंत
मायकुशीला लाभावें शिंपपण भाग्यवन्त

★

## साधाया येईना ।

साधाया येईना स्वतःचाही अर्थ
गप्पा व्यर्थ व्यर्थ पांडित्याच्या
सगळ्यांसारखी दुबळी – नेभळी
उगा जगावेगळी मिरवलें
दिसतां थोडेसें काळोखें अंगण
उंबऱ्यामधून पाय आंत !
श्रद्धा भंगलीसे बुद्धि पांगलीसे
नाव भग्न भासे जीवनाची
कोणाचा आधार अशा काळरात्रीं ?
विश्वासूं मी तरी कोणावर ?
कुठेंतरी असेल निःश्रेयस माझें
दाखवावा तयें मार्ग मला
ना तरी चाललें खोल रसातळा
आणि अवकळा नशिबाला !

★

## । सकाम ही सेवा

बुद्धि पांगुनिया धैर्य ढळलेसें
होई सुचेनासें जेव्हां, तेव्हां
कामाचा पसारा मांडून बसतें
त्यांत घालवितें वेळ सारा
इकडे सफाई तिथें दे झिलई
हात लक्ष्मीमाई फिरवूं दे
कधीं रांगोळीनें अंगण सजव
भूषणीं शोभव बालमूर्ति
दळतां-कांडतां तुजशीं अनंता !
विसरतां चित्ता सुख होय
भगवंता ! तुझी सकाम ही सेवा
तुज विसराया करीतसें !

★

## श्रावण ।

हा न बेभान श्रावण
धुंद आवेगावांचून
विसांवतां भारावून
धुंदकारली धरणी
– असेंच ना तूं वेढतां
मिटे नयनपाकळी

ही तों तुझी – माझी प्रीत
जिला दुजें न माहीत
याच्या श्यामल मिठींत
हांसूं ओलावे दिठींत
मज मालवतें सारें
कांहीं पालवे गहिरें !

क्षण तरल तुषारी
दाट वनींच्या झऱ्याचें
– असेंच ना कांहींसें तूं
उलगडे कैफ ज्याचा

दूर पटल सरावें
स्मित अस्फुट झरावें,
बोलतोस निःश्वासून
शब्दा – अर्थाहिवांचून !

असा बघतां बघतां
तीरापरी शिरावाच

गर्द राईच्या उरांत
भाट सृष्टीचा उन्मत्त,

आणि आठवती मला असे सहज वेगांत
कंठाखालीं टेकलेले तुझे आसुसले ओठ

– छेः, न श्रावण बेभान भानहीन मीच खुळी
मत्त राधिका मनींची तुझ्या रंगीं हरपली !

★

# कधींतरी ।

कधींतरी चुकावींत
पाउलें हीं रुळलेलीं
कधींतरी निसटावी
वाट पायां खिळलेली

उलटावें मन आणि
पालटावी जग–कळा
व्हावा अनर्थ घडाया
अर्थ नवीन वेगळा !

ऐलथडीं सुरक्षित
माझें चिरेबंदी घर
वहावत भिंती दारें
यावा अलौकिक पूर

६५ : चैत्रपुष्प
...५

– आणि कोसळावा तोल
त्याच्या लागावें धारेला
आपुल्याच संगतीनें
जावें आपुल्या दिशेला !

*

# ओली झुळूक

ओली झुळूक लहरी
क्षण भिडली अंगाला
लाल–हिर्वा गुल्मोहर
उभा शहारून गेला

कांहीं ओढाळ स्मरलें
– असें... धुंदावल्या दिशीं...
सुखक्षणांच्या झरल्या
तळीं पोवळयांच्या राशी !

★

# । एकदांच तूं –

एकदांच तूं
दो क्षितिजांचे हात फाकुनी
म्हटलें होतें
" ये ये राधे ! मिठींत माझ्या
ये, कर सार्थक शंकांचें डंखांचें
तडफडणाऱ्या कातर आशंकांचें !
– पण नकोत तेव्हां स्मरले मजला
डोळे दोन अभागी,
आधारास्तव चांचपणारा
स्पर्श कांपरा, भितरा, अधिरा,
स्मरली अगतिक हळवी आण
– शतजन्मांची !
आणि गुंतलें फिरलें मागें
मिठी चुकवुनी !

– तेव्हांपासुन
हुळहुळताहे
स्पर्श कांचता
त्या क्षितिजांचा !

★

## । तो भरलेला जहरी पेला

तो भरलेला जहरी पेला
अखेर मी घेतलाच उचलुन
– आणि अचानक घुमूं लागले
पावलांतुनी पागल पैंजण

अधरांवर मोहरून आली
कल्पद्रुमाची मत्त डहाळी
बुडवित मजला धुंद विषाची
भरली यमुनेपरी काजळी

– अतां विरे तनु उरली भोंवळ
आर्त दर्द गातें...अधरांविण !
धुंद विषाची – तुझीच अथवा ?
हेंही बघ मी बसलें विसरुन !

★

## फक्त — !

टळलें टळलें वाटत होतें
आज पुन्हां पण
तव खिळल्या नजरेंतुन
कळलें
वादळ अजुनिहि जवळच आहे
— फक्त
जळाला हवा उमाळा !

★

# श्रावणांतल्या या किरणांपरि

श्रावणांतल्या या किरणांपरि
लवत्या हिरव्या लाटांवरुनी
पसरत घसरत जावें,
उशी घेउनी
क्षण वेढावें
कर्दळिच्या तळुख लालीला,
क्षण खुलवावें
स्मित जाईचें मुग्ध सुगंधित,
क्षण चमकावें
तुष्ट गुराच्या गळघंटेवर
रानपोरिच्या गळेसरीवर
डोळ्यांवर, भुरभुर झिपऱ्यांवर,
पिंपळपानांवरी
रुपेरी वर्ख माखुनी

हळुंच शिरावें
घनमालेच्या पेंगुळल्या पापणींत
जावें विरघळुनी
अन् स्वप्न बनावें
विस्मित रंगीं
थरथरणाऱ्या
इंद्रधनूचें;
श्रावणांतल्या या किरणांपरि !

★

## । निरोप –

अजून आहे ना थरथरता
ठसलेला आठव ओठांवर ?
अजून आहे निघतांनाचा
विळखा खिळलेला अंगावर ?

"जपून जा हं" शब्द कांपरे
अजून कुजबुजती ना कानीं ?
अधिकच धरिशी घट्ट उरीं ना
"वेडी वेडी पोर" म्हणोनी ?

अजून दिसते गाडीपाशीं
अंधुकलेली लवली दृष्टि ?
– आणिक तिरप्या जलधारांनीं
भिजली हळवी हळवी सृष्टि ?

*

## धुतली स्वच्छ हवा ।

धुतली स्वच्छ हवा नवाच आज ढंग
प्यालेल्या पानोपानीं हिरवा नाचे रंग
उजळ सांवळेंसें तृणांत खेळे ऊन
स्वच्छन्द अंकुरली चोचींत गोड तान
नऽहाळे फुलीं रंग प्राजक्ततळीं रास
धुंदींत तरळते झुळूक घेत वास
अगम्य आज कांहीं माझ्याच मनीं साठे
फुलाच्या उरीं जसा पाण्याचा थेंब दाटे
भार हा अनोळखी हृदया साहीनाच
अर्धाच अडकतो मनींचा मनीं श्वास
सावध मना वेड्या ! नको रे सोडूं धीर
कुठून कसा तरी घुसेल उरीं तीर
पहातां पहातां अन् विरेल स्वच्छ ऊन
खेळेल लाल होरी श्रावण उलटून !

## । तूं नव्हेस माझा कुणी ?

तूं नव्हेस माझा कुणी
कसें हें देउं मना पटवुनी ?
जें, बघुनहि सारें वेडनि बसलें
खोल खुळी लागणी !

अन् तुझी उपेक्षा जुनी
स्वस्थ जी अशी मला पाहुनी
कां पालटेल कधिं ओघ, एकदां
वळलेला बाजुनी ?

परि कधीं असावध क्षणीं
भेटतां नजर तुझी हरखुनी
जरा चरकुनी
तूं नव्हेस माझा कुणी, कसें हें
घ्यावें तरि पटवुनी ?

*

मराठी ग्रंथ सं्रहालय, ठा... स्थळप्रत
अनुक्रम 32490 वि: ०५kc५
क्रमांक 9460 नों दि 23/3/92

# भाद्रपदांतील सकाळ !

भाद्रपदांतिल
गहिवरलेली सकाळ आली
हलकें हुंगित
बाळतणाचें न्हालें जावळ,
जरा सरकलें ऊन
हंसरें गोरें
लुकलुकत्या डोळयांचें,
आळसावल्या घरट्यामधुनी
अलगद उठली
भिजट सुरांची
नाजुक झिरमिळ,

— आणि वडाच्या
पिकलेल्या दाढीवर
कां थरथरले
सुखार्त ओघळ ?

★

# आळवणी ।

असं उठल्या उठल्या
ठेव मोत्यामाणकांची
असा खेळतां खेळतां
घर लागे हुंदडाया
अशा जेवतां जेवतां
लाख आर्जवें आईचीं
असे बाहेर जातांना
ठेच लागे उंबऱ्याची
असं झोपतां झोपतां
गाई हिंडून भागल्या
असं झोपल्या झोपेंत
अरे ! असतं नसतं

हसूं नये खुदुखुदूं
नये अशीतशी सांडूं !
घालूं नये रे धिंगाणा
भान राहीना भिंतींना
दावूं नये बारा चवी
एकदोन रे ! ऐकावीं
धरूं नये घट्ट ओचे
वाट पायतळीं बोचे
अडूं नये ओवीसाठीं
बारा रानं तुझ्यापाठीं
हंसूं नये साखरेचं
भोंतीं कुणी पाखरेचं !

★

## । निस्तब्ध रात्र ही

निस्तब्ध रात्र ही
– तुझी गहन माधुरी
थरकतो गारवा
– तुझीच ही शिरशिरी !

उन्माद तरळतो
भरल्या मेंदीवरी
चाळवे सावली
दाटुनि कांहीं उरीं

शेवगा धवळला
बहरुनि अभ्यन्तरीं
चांदणें नाचवी
अंगाअंगावरीं

वरिं निळा पसरला
सुखस्पर्श उत्कट

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32490 वि: काव्य
क्रमांक 9460 नों दि: 23/3/62

उरिं तुडुंब भरल्या
डहुळे अमृतघट

– सारेंच असें कीं
तुझीच व्हावी सय
अन् तुझ्याविनाही
तुझ्यांत लावी लय !

★

## । आषाढाच्या वटपत्रावर

जणूं छेडिते मग्न अंगुली
तसे ठिबकती थेंब झरझरां
मत्त लयीच्या द्रुत तालावर
विणीत इवल्या स्वरवलयांनीं
आषाढाची आर्द्र धुंद गत !
क्षितिज मनाचें लवुन ऐकतें
भिडते भिनते आर्त धुंद गत
– आणि अचानक
आषाढाच्या वटपत्रावर
सांपडते मज
मीच मीच
जी कुठें कुठें हरवुन बसलेली !

*

## प्राक्तन ।

माथ्यावरचा घडा मी अभंग घेऊन जात होतें
– नि अभंगच घेऊन येत होतें,
मी पैंजण घालून गेलें
त्याला चाहूल लागावी म्हणून
– मी पैंजण काढून गेलें
त्याला चाहूल लागूं नये म्हणून
पण त्याची चाहूल कधीच नाहीं लागली
यमुनेच्या पाण्यांत वाकलेल्या
माझ्या माथ्यावरची कदंबाची फांदी
कधींच नाहीं सावधपणानं हलली !
– आणि भरल्या पेठेंतून
माझ्या अभंग घड्याचं ओझं घेऊन येतांना
मी ऐकत होतें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११९६०
शाखा
REFBK-0011960
REFBK-0011960

त्यानं कितीक जणींना संसारांतून उठवल्याचं
जन्माजन्मांचं पारणं फिटवल्याचं
एकाच खड्यानं
कितीक जणींचं मातीचं प्राक्तन फोडल्याचं
मी तिरमिरीनं गेलें यमुनेच्या कांठीं
माथ्यावरचा घडा फोडला
अंगांग भिजवून घेतलं
नि भरल्या पेठेंत जाऊन ओरडलें
" पहा होऽ ! या काळयानं माझा सत्यानाश केला
माझा घडा फोडला
मला उभी भिजवली
मला भरल्या संसारांतून कीं हो उठवली ! "
पण –
जाणती पेठ सारी हंसून उठली !
– पहा हो या काळयानं माझा सत्यानाश केला !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
★
अनुक्रम 32590 वि: काव्य
क्रमांक 9560 नों: दि: 23/3/82